नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १७५ Issue - 175 | वार शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २०२५ Blow- Friday Date 14 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पुण्यात भीषण अपघातात ८ जण जिवंत जळाले

## २० ते २५ जण जखमी; पुण्यातील नवले ब्रीजवर घडली दुर्घटना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे: पुण्यातील नवले पूल परिसरात मोठा अपघात झाला आहे. ब्रेक फेल झालेल्या कंटेनरनं २० ते २५ वाहनांना धडक दिली. हा कंटेनर धडका देत भरधाव वेगात निघाला होता. त्याच्यापुढे एक कंटेनर होता. त्या कंटेनरला धडक देण्याआधी ब्रेक फेल झालेल्या कंटेनरनं एका कारला धडक दिली. लहान कार दोन कंटेनरच्या मधोमध अडकली. या कारचा चक्काचूर झाला. सीएनजीवर चालत असलेल्या कारनं पेट घेतला. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी झाले आहेत. यातील काही जणांनी प्रकृती गंभीर आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवण्यात येत आहे.

पुण्यातील नवले पूल परिसरात आज संध्याकाळच्या सुमारास भीषण अपघात झाला. साताऱ्याहून मुंबईच्या दिशेला निघालेल्या कंटेनरनं अनेक वाहनांना धडक दिली. हा कंटेनर मंद उतारावरुन खाली येत होता. जवळपास २० ते २५ वाहनांना धडक देत तो पुढे गेला. त्यानंतर या कंटेनरनं एका फॅमिली कारला धडक दिली. कंटेनरची धडक बसल्यावर कार अचानक पुढे गेली. कारच्या पुढे दुसरा कंटेनर होता. दोन कंटेनरच्या मध्ये कार अडकली. कारमध्ये सीएनजीचा सिलिंडर होता. दोन कंटेनरच्या मधोमध अडकल्यानं कारचा चेंदामेंदा झाला. सिलिंडरचा स्फोट होताच आग लागली. त्यामुळे मागील कंटेनरदेखील पेटला. कंटेनरमधून एक मृतदेह बाहेर काढण्यात आला असून कारमधून दोन महिला आणि एका मुलीचा मृतदेह काढण्यात यश आलं आहे. आणखी मृतदेह हाती लागण्याची शक्यता आहे. या अपघातात २० जण जखमी झाले आहेत. त्यातील काहींची प्रकृती गंभीर आहे. सर्व जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यांना विविध रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

डीसीपी संभाजी कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, राजस्थान पासिंगचा एक कंटेनर साताऱ्याकडून मुंबईच्या दिशेनं जात होता. नवले पुलावर सेल्फी पॉईंट असलेल्या भागात या ट्रकचा ब्रेक फेल झाला असण्याची शक्यता आहे. कारण उतारावर मोठ्या प्रमाणावर लहान लहान आकारचे गतीरोधक आहेत. त्यामुळे कंटेनरचा ब्रेक फेल झाला असण्याची शक्यता आहे. ब्रेक फेल झाल्यानं कंटेनरनं अनेक वाहनांना धडक दिली असावी.

डीसीपी संभाजी कदम यांनी सध्या तरी घातापाताची शक्यता फेटाळली आहे. 'वाहनांमध्ये अडकलेल्यांची सुटका करण्याला सध्या प्राधान्य आहे. जखमींना रुग्णालयात दाखल केलं जात आहे. मृतदेह बाहेर काढण्याचं काम सुरु आहे. वाहनांना लागलेली आग नियंत्रणात आणण्यात आली आहे. दोन मोठ्या वाहनांना हटवण्यासाठी क्रेन आणल्या गेल्या आहेत. वाहतूक सुरळीत करण्यास आम्ही प्राधान्य देत आहोत. या अपघातामागील कारणांचा तपास नंतर केला जाईल,' अशी माहिती डीसीपी कदम यांनी दिली.

# माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्याचे माजी आमदार तथा भाजपचे ज्येष्ठ नेते पोलादी पुरुष आणि सहकारातील खंबीर नेतृत्व सिद्रामप्पा पाटील यांची गुरुवारी रात्री अल्पशा आजाराने सोलापुरातील खाजगी रुग्णालयात प्राणज्योत मालवली वयाच्या ८८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला त्यांच्या निधनानं अक्कलकोट तालुक्यासह राजकीय सामाजिक अन सहकार क्षेत्रात शोककळा पसरली त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या मूळ गावी अक्कलकोट तालुक्यातील कुमठे इथं शुक्रवारी दुपारी तीन वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत सिद्रामप्पा पाटील यांच्या निधनाचं वृत्त समजताच राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्यासह अनेक नेत्यांनी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तीव्र शोक व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली सिद्रामप्पा पाटील यांनी प्रतिकूल परिस्थितीत मोठा संघर्ष उभा करून अक्कलकोट तालुक्यात भाजपाची बांधणी केली इतकच नाही तर तालुका भाजपामय केला सहकार क्षेत्रातील त्यांचं कार्य हे सामान्यजन आणि शेतकऱ्यांना दिलासा देणारं मोठा आधार देणारं होतं शेतकरी केंद्रस्थानी ठेऊन आयुष्यभर त्यांच्यासाठी झटणारं एक खंबीर नेतृत्व आज काळाच्या पडद्याआड गेलं अशी भावना व्यक्त करण्यात आली. गावच्या सरपंचपदापासून पंचायत समिती सभापती जिल्हा परिषद उपाध्यक्ष सोलापूर जिल्हा बँकेचे सलग ३५ वर्षे संचालक एकवेळ उपाध्यक्ष तसंच श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष मार्केट कमिटी सभापती तालुक्याचे आमदार असा सिद्रामप्पा पाटील यांचा कर्तृत्ववान राजकीय प्रवास राहिला अक्कलकोट तालुक्याच्या सर्वांगीण विकासात त्यांचा सिंहाचा वाटा राहिला या दरम्यान अनेक दिग्गज नेत्यांशी सिद्रामप्पा पाटील यांची जवळीक राहिली भाजप नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे ते कट्टर समर्थक मानले जात वयाच्या ८७ व्या वर्षापर्यंत सिद्रामप्पा पाटील यांचं राजकीय आणि सामाजिक कार्य अखंड पणे सुरु होत गेल्या काही दिवसापासून त्यांना आजाराने ग्रासलं होतं दरम्यान सोलापुरातील अश्विनी रुग्णालयात उपचार सुरु असताना रात्री ८ वाजून १७ मिनिटांनी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

# बिहार निवडणुकीचा आज निकाल; २४३ जागांसाठी आज मतमोजणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पाटणा : बिहारमध्ये नीतिशकुमार की तेजस्वी यादव? कोण होणार बिहारचा मुख्यमंत्री याचं उत्तर आज मिळणार आहे. बिहारमधील २४३ जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत छऊ आणि महागठबंधन यांच्यात थेट टक्कर आहे, तर प्रशांत किशोरांच्या जन सुराज पक्षामुळे त्रिकोणी लढत रंगत आहे.

बिहारच्या निवडणुकीत झालेल्या राजकीय आरोप प्रत्यारोपांची देशभरात चांगलीच चर्चा झाली. नितीशकुमारांचं चॅनल दिल्लीतून रिमोटसारखं बदललं जातं असा आरोप राहुल गांधी यांनी केला. तर महागठबंधनला रोखण्यासाठी अमित शाह यांनी आपल्या प्रचार सभेत जोरदार हल्ला चढवलेला पाहायला मिळाला. जंगलराज रोखण्यासाठी कमळाचं बटण दाबा असा गंभीर आरोप अमित शाहांनी केलेला पाहयाल मिळाला. त्यामुळे जनता कुणाच्या आरोपांना खरं मानणार आणि कुणाला खोटं ठरवणार याचं उत्तर आज मिळेल.

बिहारमधील २४३ विधानसभा जागांसाठी आज मतमोजणी होणार आहे. आधी पोस्टल मतपत्रिका मोजल्या जातील. त्यानंतर ईव्हीएम मतांची मोजणी केली जाणार आहे. ३८ जिल्ह्यांमधील ४६ मतदान केंद्रांवर मतमोजणीसाठी कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.. दरम्यान २४३ निवडणूक अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली, त्यांच्यासोबत तैनात असलेल्या २४३ निरीक्षकांच्या उपस्थितीत आणि उमेदवार किंवा त्यांच्या एजंटच्या उपस्थितीत मतमोजणी केली जाणार आहे. बिहारमध्ये पहिल्या टप्प्यात १८ जिल्ह्यातील १२१ मतदारसंघात ६५.०८ टक्के मतदान पार पडलं आहे. गेल्यावेळी पहिल्या टप्प्यात ५७.२९ टक्के मतदान झालं. तर, बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्यात २० जिल्ह्यातील १२२ जागांवर ६८.७६ टक्के मतदान झालं आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार बिहारमध्ये एकूण ६६.९१ टक्के मतदान झालं आहे. एनडीएला २०२० मध्ये १३२ जागा मिळाल्या होत्या. तर, महागठबंधन बहुमतापासून दूर राहिलं होतं. राजदला ७५ जागा, काँग्रेसला १९ आणि सीपीआये माले पक्षाला १२ जागांवर विजय मिळालेला.

बिहार विधानसभा निवडणुकीतील २४३ जागांसाठी दोन टप्प्यात मतदान झाल्यानंतर, एक्झिट पोलचे निकाल आता समोर आले आहेत. मॅट्रिज आयएएनएसच्या एक्झिट पोलनुसार, राज्यात एनडीए पुन्हा सरकार स्थापन करण्याच्या तयारीत आहे. एनडीएला १४७ ते १६७ जागा मिळण्याची अपेक्षा आहे. महाआघाडीला ७० ते १०० जागा मिळण्याचा अंदाज आहे. या पोलनुसार, नितीश कुमार यांचा जेडीयू एनडीएमधील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे, तर आरजेडी महाआघाडीतील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे.

# दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपीचे डीएनए जुळले; डॉक्टर शिकणारे विद्यापीठ सुद्धा चौकशीच्या रडारवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ला परिसरात झालेल्या बॉम्बस्फोटाच्या तपासात महत्वपूर्ण प्रगती झाली आहे. तपास पथकांनी स्फोटस्थळी सापडलेल्या दात, हाडे, रक्त लागलेले कपड्याचे तुकडे तसेच पायाचा काही भाग फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवला होता. हे सगळे नमुने मुख्य आरोपी डॉ. उमर उन नबी यांच्या आईच्या ऊछ शी जुळले असल्याचे निष्पन्न झाले आहे, त्यामुळे आरोपीचे मृतदेह सापडल्याची पुष्टी मिळाली आहे.

दुसरीकडे, या स्फोटाचा सर्वात जवळचा उउढत व्हिडिओ मिळाला आहे. या १० सेकंदांच्या फुटेजमध्ये सायंकाळी ६.५१ वाजता लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळील सिग्नल हिरवा होताच, २० हून अधिक गाड्या पुढे जात असताना, एक ळ२० कारमध्ये अचानक स्फोट झाला आणि मोठ्या ज्वाळा उठल्या. स्फोटामुळे आजूबाजूच्या अनेक वाहनांचे तुकडे झाले. केंद्रीय सरकारने या घटनेला दहशतवादी हल्ला म्हणून घोषित केले आहे. बुधवारी झालेल्या कॅबिनेट बैठकीत या कार बॉम्बस्फोटासंदर्भात अधिकृत प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

तपासातील आणखी माहिती अशी की, दिल्ली पोलिसांना लाल रंगाची इको स्पोर्ट्स कार (DL10-CK-0458) चा या हल्ल्यात सहभाग असल्याची शंका होती. उशीरा मिळालेल्या माहितीवरून ही कार हरियाणातील खंदावली गावात लावारस अवस्थेत सापडली. कारचे रजिस्ट्रेशन मुख्य आरोपी डॉ. उमर उन नबी यांच्या नावावर आहे.

दरम्यान, दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटानंतर, तपास यंत्रणांनी आता फरिदाबादच्या अल-फलाह मेडिकल कॉलेजवर लक्ष केंद्रित केले आहे. एकेकाळी आधुनिक सुविधांसाठी प्रसिद्ध असलेले हे कॉलेज आता दहशतवादी संबंधांच्या आरोपांनी व्यापले आहे. जम्मू आणि काश्मीर पोलिस आणि राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) पथकांनी बुधवारी (१२ नोव्हेंबर) कॉलेजवर छापा टाकला. तपासात असे दिसून आले की स्फोटात सहभागी असलेले चार डॉक्टर - डॉ. उमर उन नबी, डॉ. मुझम्मिल, डॉ. शाहीन शाहिद आणि डॉ. निसार-उल-हसन - कॉलेजशी संबंधित होते.

## बदला घेण्यासाठी विशेष तारीखही ठरलेली

# दिल्ली स्फोट : एक-दोन नव्हे, ३२ कारचा वापर होणार होता; दहशतवाद्यांचा कट उधळला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नवी दिल्ली : दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ कारमध्ये झालेल्या स्फोटात १३ जणांचा मृत्यू झाला. या स्फोटात २० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. या प्रकरणाचा तपास करताना अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा उलगडा झाला आहे. व्हाईट कॉलर टेटर प्रकरणाचे धागेदोरे आतापर्यंत ४ कारशी जोडले जात होते. पण आता या संदर्भात महत्त्वाचा तपशील पुढे आला आहे. जैश-ए-मोहम्मदचे दहशतवादी असा एकूण ३२ कार तयार करत होते. त्यांचा वापर ६ डिसेंबर रोजी केला जाणार होता. ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद पाडण्यात आली. त्याचा बदला घेण्यासाठी जैशकडून बॉम्ब स्फोट घडवले जाणार होते.


दिल्लीतील बॉम्ब स्फोटाचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी स्फोट घडवून आणण्यासाठी आणि स्फोटकं वाहून नेण्यासाठी ३२ कार तयार करत होते. यामध्ये सोमवारी स्फोटासाठी वापरण्यात आलेल्या हुंडाई आय २० कारचाही समावेश होता. याशिवाय मारुती सुझुकी ब्रेझा, मारुती स्विफ्ट डिझायर, फोर्ड इकोस्पोर्ट जप्त करण्यात आल्या आहेत. तपास यंत्रणांना वेळीच कटाची माहिती मिळाल्यानं दहशतवाद्यांचा कट उधळला गेला.

या सर्व कारचा वापर ६ डिसेंबरला स्फोट घडवण्यासाठी केला जाणार होता. अयोध्येतील बाबरी मशीद पाडण्यात आली, त्या घटनेला पुढील महिन्यात ३३ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यामुळे त्याच दिवशी दहशतवाद्यांना स्फोट घडवायचे होते. दहशतवादी ज्या ज्या ठिकाणी स्फोट घडवणार होते, त्यातील ६ ठिकाणं दिल्लीतील आहेत. आतापर्यंत जप्त करण्यात आलेल्या कार दहशतवाद्यांनी त्यांच्या कारवाया घडवण्यासाठी वापरल्या. या कार जुन्या होत्या. त्या अनेकांनी वापरुन विकल्या होत्या. त्यामुळे कट रचणाऱ्यांपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना अडचणी आल्या.

या कटात सामील असलेली चौथी कार मारुती सुझुकी ब्रेझा (क्ठ ८७ ण ९९८८) गुरुवारी फरीदाबादच्या अल-फलाह स्कूल ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च सेंटरमधून जप्त करण्यात आली आहे. दिल्ली स्फोटाशी संबंधित अनेक दहशतवादी याच विद्यापीठातून डॉक्टर म्हणून कार्यरत होते. समाजात डॉक्टर म्हणून वावरणारे उच्चशिक्षित तरुण प्रत्यक्षात मात्र समाजविघातक कृत्यात गुंतलेले होते.

तपासकर्त्यांनी फोर्ड इकोस्पोर्ट कार बुधवारी संध्याकाळी फरीदाबादमधून ताब्यात घेतली. या कारचा वापर दहशतवाद्यांनी स्फोटकांच्या वाहतुकीसाठी केला होता. तर एक मारुती स्विफ्ट डिझायर सोमवारी स्फोटाआधी जप्त करण्यात आली होती. त्यामध्ये एक असॉल्ट रायफल आणि दारुगोळा सापडला होता.


जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य

१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी, पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५. स्टिकर ६. पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी

नितीन हलसगी

मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### समीकरणे बदलणार

बिहारमध्ये नीतिशकुमार की तेजस्वी यादव? कोण होणार बिहारचा मुख्यमंत्री याचं उत्तर आज मिळणार आहे. बिहारमधील २४३ जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत छऊ आणि महागठबंधन यांच्यात थेट टक्कर आहे, तर प्रशांत किशोरांच्या जन सुराज पक्षामुळे त्रिकोणी लढत रंगत आहे. बिहारच्या निवडणुकीत झालेल्या राजकीय आरोप प्रत्यारोपांची देशभरात चांगलीच चर्चा झाली. नितीशकुमारांचं चॅनल दिल्लीतून रिमोटसारखं बदललं जातं असा आरोप राहुल गांधी यांनी केला. तर महागठबंधनला रोखण्यासाठी अमित शाह यांनी आपल्या प्रचार सभेत जोरदार हल्ला चढवलेला पाहायला मिळाला. जंगलराज रोखण्यासाठी कमळाचं बटण दाबा असा गंभीर आरोप अमित शाहांनी केलेला पाहयाल मिळाला. त्यामुळे जनता कुणाच्या आरोपांना खरं मानणार आणि कुणाला खोटं ठरवणार याचं उत्तर आज मिळेल. बिहारमधील २४३ विधानसभा जागांसाठी आज मतमोजणी होणार आहे. आधी पोस्टल मतपत्रिका मोजल्या जातील. त्यानंतर ईव्हीएम मतांची मोजणी केली जाणार आहे. ३८ जिल्ह्यांमधील ४६ मतदान केंद्रांवर मतमोजणीसाठी कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.. दरम्यान २४३ निवडणूक अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली, त्यांच्यासोबत तैनात असलेल्या २४३ निरीक्षकांच्या उपस्थितीत आणि उमेदवार किंवा त्यांच्या एजंटच्या उपस्थितीत मतमोजणी केली जाणार आहे. बिहारमध्ये पहिल्या टप्प्यात १८ जिल्ह्यातील १२१ मतदारसंघात ६५.०८ टक्के मतदान पार पडलं आहे. गेल्यावेळी पहिल्या टप्प्यात ५७.२९ टक्के मतदान झालं. तर, बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्यात २० जिल्ह्यातील १२२ जागांवर ६८.७६ टक्के मतदान झालं आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार बिहारमध्ये एकूण ६६.९१ टक्के मतदान झालं आहे. एनडीएला २०20 मध्ये १३२ जागा मिळाल्या होत्या. तर, महागठबंधन बहुमतापासून दूर राहिलं होतं. राजदला ७५ जागा, काँग्रेसला १९ आणि सीपीआये माले पक्षाला १२ जागांवर विजय मिळालेला. बिहार विधानसभा निवडणुकीतील २४३ जागांसाठी दोन टप्प्यात मतदान झाल्यानंतर, एक्झिट पोलचे निकाल आता समोर आले आहेत. मॅट्रिज आयएएनएसच्या एक्झिट पोलनुसार, राज्यात एनडीए पुन्हा सरकार स्थापन करण्याच्या तयारीत आहे. एनडीएला १४७ ते १६७ जागा मिळण्याची अपेक्षा आहे. महाआघाडीला ७० ते १०० जागा मिळण्याचा अंदाज आहे. आजचा निकाल राजकीय समीकरणे बदलणार हे मात्र नक्की.

# बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१४ नोव्हेंबर हा दिवस भारतात 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे विशेष महत्त्व असे की हा भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जयंती दिवस आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंना बालकांविषयी अपार प्रेम होते. त्यांच्या हृदयात मुलांप्रती जिव्हाळा, स्नेह आणि करुणा होती. ते म्हणत, आजची मुले उद्याचा भारत घडवतील. त्यांच्यावर देशाचे भविष्य अवलंबून आहे. खरंच, एक समाज, एक राष्ट्र अथवा एक संस्कृती किती प्रगत, संवेदनशील आणि सुजाण होईल याचा पाया त्याच्या बालकांच्या संगोपनात दडलेला असतो. 'बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार' हा विचार केवळ एक घोष नव्हे तर एका संपन्न, न्याय्य, प्रगतिशील आणि मानवतावादी समाजव्यवस्थेची मुळाक्षरे आहे. मानवसमाजाचे अस्तित्व चालू ठेवणारा, त्यात बदल, विकास आणि सुधारणांची बीजांकुरे पेरणारा घटक म्हणजे 'बालक' होय. त्यामुळे बालकांचे संगोपन, संरक्षण, शिक्षण आणि व्यक्तित्वविकास ही समाजाची केवळ नैतिक जबाबदारी नाही तर अस्तित्वाची गरज आहे.

बालक हा जन्मतः निष्पाप, कोवळा, कोरा आणि जगाविषयी उत्सुकतेने भरलेला असतो. हा कोरा कागद समाज, कुटुंब, शाळा, सांस्कृतिक संस्था, माध्यमे आणि आजूबाजूच्या परिस्थितीच्या स्पर्शाने आकार घेतो. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता बालक समाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून 'माणूस' म्हणून घडतो. या समाजिकीकरणाच्या प्रवासात बालकाला जे मूल्य, नैतिकता, संस्कार, दृष्टीकोन आणि जीवनपद्धती देण्यात येते तीच पुढील पिढीचा कणा बनते. त्यामुळे बालकांचे संगोपन हा वैयक्तिक नाही तर सामाजिक गुंतवणुकीचा भाग आहे. ज्या समाजात बालकांना सुरक्षित वातावरण, प्रेम, शिक्षण आणि संधी उपलब्ध होते तो समाज पुढे जाऊन विकासशील आणि समतामूलक होतो. उलट, ज्या समाजात बालकांना दुर्लक्षित, शोषित आणि उपेक्षित ठेवलं जातं तिथे असमानता, हिंसा, अन्याय आणि अत्याचार वाढतो.

भारतीय समाजरचनेत बालकांची स्थिती पाहिली तर एक चित्र आशादायी तर दुसऱ्या बाजूला चिंताजनक आहे. एकीकडे मुलांचे हक्क, शिक्षण आणि संरक्षण यासाठी कायदे, धोरणे आणि शासकीय योजना अस्तित्वात आहेत. 'मुलांकरिता मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार अधिनियम २००९', 'बालकांचे संरक्षण (झजउडज) कायदा', 'बालकल्याण समित्या', 'अंगणवाडी योजने'पासून 'बाल आरोग्य राष्ट्रीय कार्यक्रमां'पर्यंत अनेक उपक्रम राबवले जात आहेत. परंतु वास्तवात अजूनही शिक्षणाऐवजी मजुरी करणारी मुले, रस्त्यावर भटकणारी निराधार मुले, कुपोषणाची झळ सोसणारी बालके, तस्करी आणि अत्याचारांची बळी पडणारी मुले, सामाजिक-आर्थिक विषमतेमुळे शाळेबाहेर पडणारी मुले हा कटू अनुभव आपल्या समाजात दिसतो. समाज कितीही प्रगत झाल्याचे उदाहरण दिले तरी बालकांच्या चेहऱ्यावरची असुरक्षितता, भीती, उपासमार किंवा असमान संधींची वेदना समाजाच्या अंतरात्म्याला खणखणीत प्रश्न विचारते.



बालकांना सुरक्षित आणि पोषक वातावरण देण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे 'कुटुंब' होय. कुटुंब ही बालकाची पहिली शाळा आणि आई-वडील हे पहिले शिक्षक आहेत. पण पाहिलं तर आधुनिक काळात कुटुंबसंस्था मोठ्या प्रमाणात बदलत चालली आहे. आर्थिक ताण, स्थलांतर, संधींची स्पर्धा, माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव, कुटुंबातील संवादाचा अभाव, पालकांचे व्यसनाधीन आणि मानसिक तणावग्रस्त होणे यामुळे बालकांवर गंभीर परिणाम दिसतो. मुलांच्या भावनिक गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत तेव्हा बालक अंतर्मुख, अस्वस्थ, आक्रामक किंवा तुटक बनतो. समाजात आज वाढणारी हिंसक वर्तणूक, नैराश्य, आत्महत्या, अभ्यासाविषयीचा ताण, वर्तनातील बदल हे फक्त वैयक्तिक नव्हे तर सामाजिक संकेत आहेत. बालकांच्या मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे त्यांच्या भविष्यावर, आणि विस्ताराने देशाच्या भविष्यावर आघात आहे.

शाळा हा बालकांच्या विकासाचा दुसरा महत्त्वाचा स्तंभ होय. शाळा केवळ ज्ञान देण्याचे केंद्र नसून व्यक्तिमत्वविकास, मूल्यसंस्कार, सामाजिक जाण, नेतृत्वगुण, सहकार्य, सहिष्णुता आणि मानवी संवेदना विकसित करण्याचे स्थान आहे. शिक्षण हा केवळ गुण, परीक्षांचे निकाल, शिष्यवृत्ती किंवा प्रमाणपत्र यापुरता विषय नाही. शिक्षण म्हणजे जागृती, विवेक, विचारशक्ती, प्रश्न विचारण्याची क्षमता, निर्णयक्षमता आणि स्वतःचा स्वभाव ओळखण्याची प्रक्रिया. आज शिक्षण व्यवस्थेत अनेक सुधारणा होत आहेत, पण शिक्षणात 'मानवता' आणि 'सहजतेला' टिकवून ठेवणे ही खरी कसोटी आहे. शिक्षक हा केवळ अध्यापन करणारा व्यक्ती नसून बालकाच्या मनाचा शिल्पकार आहे. शिक्षकाच्या एका शब्दाने, एका स्पर्शाने, एका प्रोत्साहनाने बालकाचे आयुष्य आकार घेऊ शकते. म्हणून शिक्षक-विद्यार्थी नात्यातील मानवी स्पर्श टिकुन राहणे अत्यावश्यक आहे.

आजचे युग विज्ञान आणि माहिती-तंत्रज्ञानाचे आहे. मोबाइल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमे आज बालकांच्या हातात सहज उपलब्ध आहेत. यामुळे ज्ञानाचा अवकाश नक्कीच वाढला आहे. परंतु त्याचबरोबर भौतिकवादी, कृत्रिम, आभासी आणि बनावट मूल्यांचे जग देखील बालकाला ओढू लागले आहे. त्यामुळे बालकांना तंत्रज्ञानाचा सुजाण आणि संतुलित वापर शिकवणे ही वेळेची गरज आहे. नैतिकता, मूल्यसंस्कार, सहानुभूती, विनम्रपणा, संवादकौशल्य, निसर्गावरील प्रेम आणि मानवी जीवनाच्या मूळ भावनांची जपणूक करणे हे डिजिटल युगात अधिक महत्वाचे ठरते.

'बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार' हा विचार तेव्हाच साकार होतो, जेव्हा बालकांना केवळ जिवंत राहण्याचा हक्क नव्हे, तर वाढण्याचा, स्वप्न पाहण्याचा, व्यक्त होण्याचा आणि माणूस म्हणून आदर मिळण्याचा हक्क दिला जातो. प्रत्येक बालक हे मूलतः संभाव्य प्रतिभेचे केंद्र असते. ते कशात उत्तम आहेत, त्यांच्या मनाची दिशा काय आहे, त्यांची स्वप्ने कोणती आहेत हे आ-ळखणे ही मोठ्यांची जबाबदारी आहे. सर्व मुले एकसारखी नसतात, त्यांची वाढ, क्षमता, आवडीनिवडी, भावनिक गरजा वेगळ्या असतात. त्यामुळे त्यांना समान संधी देणे म्हणजे प्रत्येकाला त्याच्या वैशिष्ट्याप्रमाणे विकसित होऊ देणे होय.

यासाठी कुटुंब, शाळा, समाज, शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे या सर्वांनी एका दिशेने प्रयत्न करणे गरजेचे आहे. बालकांच्या विकासात गुंतवणूक करणे म्हणजे पायाभूत सुविधांमध्ये नव्हे तर मानवी विकासात गुंतवणूक करणे होय. ही गुंतवणूक कधीच वाया जात नाही, उलट ती एक संस्कृती, एक राष्ट्र, एक परिपूर्ण समाज घडवते.

१४ नोव्हेंबरचा 'बालदिन' हा केवळ आनंद, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम किंवा गोड खाऊचा दिवस नाही. हा दिवस बालकांच्या प्रश्नांना, त्यांच्या हक्कांना, त्यांच्या भविष्याला, त्यांच्या संरक्षणाला आणि त्यांच्या स्वप्नांना गांभीर्याने पाहण्याची स्मृती आहे. आज आपण जर प्रत्येक बालकाला सुरक्षित, सन्मानित, शिक्षित, प्रेमाने भरलेले आणि संधींनी समृद्ध वातावरण दिले तर उद्याचा समाज अधिक सक्षम, न्याय्य, समतामूलक, संवेदनशील आणि मानवतावादी असेल. कारण की आजचे बालक म्हणजे उद्याचा नागरिक, उद्याचा समाज, उद्याचे राष्ट्र आहे. म्हणूनच प्रत्येकाला हे जाणण्याची गरज आहे की आजचे बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार आहेत.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
**ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

# संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा उपक्रम व्यापक स्वरुपात राबवावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५' उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासूनच भारतीय संविधानाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार आहे. यासाठी सर्व संबंधित विभागांनी हा उपक्रम अधिक व्यापक स्वरुपात राबवावा, अशा सूचना महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिल्या.



'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा उपक्रम २०२५' ची आढावा बैठक महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या कार्यालयात झाली. बैठकीस शिक्षण, सामाजिक न्याय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, आदिवासी, अल्पसंख्यांक विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले की, या स्पर्धेचे प्रारूप लवकरच तयार केले जाणार आहे. संबंधित विभागांनी या स्पर्धेची संपूर्ण पूर्वतयारी करावी. प्रत्येक शाळेतून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी जनजागृती करावी. या स्पर्धेसाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद शाळांना

**राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम**

उपलब्ध करून दिलेल्या अनुदानातून करण्यात यावी.

शालेय शिक्षण विभागाने हा उपक्रम अधिक व्यापक प्रमाणात राबवण्यासाठी आवश्यक परवानगी त्यांच्या स्तरावर घ्यावी. याबाबत तातडीने कार्यवाही करून अहवाल कार्यालयास सादर करावा, असेही धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले.

आदिवासी विकास विभागाने त्यांच्या अखत्यारित असलेल्या वसतिगृहात हा उपक्रम राबवण्याची संपूर्ण तयारी केली असल्याचे सांगितले. सामाजिक न्याय विभागानेही शासकीय निवासी शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यासाठी खर्चाची तरतूद केली जात असल्याचे सांगितले. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत आश्रम शाळेमधील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविला जाणार असल्याचे सांगितले.

अल्पसंख्यांक विभागामार्फत अल्पसंख्यांक विभाग योजनेचे लाभार्थी मुलांची वसतिगृह, शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी यांनाही उपक्रमात सहभागी करून घेतले जाईल असे सांगितले. प्रश्नमंजुषा उपक्रम ुर्ीरिलरीशशी.लो या संकेतस्थळाद्वारे राबविण्यात येणार आहे.

# भोकरी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच निवडणुकीत विरोधी गटाचा दे धक्का !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : ग्रामीण भागातील केंद्रबिंदू स्थानी असलेल्या भिवंडी तालुक्यातील भोकरी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी विपुल लक्ष्मण जाधव यांची बिनविरोध निवड पार पडली.अध्यासी अधिकारी म्हणुन ग्रामपंचायत अधिकारी प्रल्हाद वानखेडे यांनी काम काज पार पाडले.या बिनविरोध निवडणुकीत सर्व विद्यमान सदस्यांनी सहभाग घेतला.



सत्ताधारी गटाविरोधात रोहीदास गोरले, माजी सरपंच महादेव गोरले, माजी उपसरपंच उमेश कथोरे, माजी उपसरपंच, पंडीत माळी , मिथुन जाधव, महेश चव्हाण, विश्वास भोईर यांच्या गटाच्या उमेदवाराची उपसरपंच पदी बिनविरोध निवड जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी मोठ्या संख्येने जल्लोष व्यक्त करत फटाक्यांची आतिषबाजीने शुभेच्छा देत आनंद व्यक्त केला. तर नवनिर्वाचित उपसरपंच विपुल जाधव यांनी संपूर्ण ग्रामस्थांचे आभार मानले असुन गावाच्या विकासासाठी सदैव तत्पर राहणार असल्याची भावना यावेळी व्यक्त केली.

**आरोग्य सेवेच्या गुणवत्तेसाठी रचनात्मक उपक्रमांवर भर देण्याचे निर्देश**

**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर**

# नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठी सेवांची प्रभावी अंमलबजावणी करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील आरोग्यसेवा अधिक प्रभावी आणि दर्जेदार करण्यासाठी विभागामार्फत रचनात्मक कामांवर भर द्यावा, तसेच नागरीकांना पुरवण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. आरोग्य भवन येथे आरोग्य विभागाच्या विविध सेवांचा आढावा मंत्री आबिटकर यांनी घेतला त्या वेळी ते बोलत होते. या बैठकीत लसीकरण, कर्करोग निदान, सिकल सेल नियंत्रण, मानसिक आरोग्य, मधुमेह आणि उच्च रक्तदाब या विषयांवर चर्चा झाली.

बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालक डॉ. सुनिता कोल्हाहित, सहसंचालक सांगळे, सहाय्यक संचालक दीप्ती पाटील देशमुख यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



आरोग्य विभागाचा निधी रचनात्मक आणि परिणामकारक कामांवर खर्च व्हावा असे सांगून सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले की, विशेषतः लसीकरण, कर्करोग निदान व उपचार, तसेच सिकल सेल अनुवांशिक आजार नियंत्रणासाठी ठोस उपक्रम राबवावेत. या सेवांसाठी आवश्यक निधी नियोजनपूर्वक वितरित करावा. राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत देशभरात सुरू असलेल्या नवकल्पनांचा अभ्यास करून, महाराष्ट्रासाठी उपयुक्त योजना समाविष्ट कराव्यात. विभागाने तज्ज्ञांचे मत जाणून घेत नियोजन करावे, तसेच आरोग्यसेवा पुरवताना नागरिकांना अधिकाधिक सुविधा मिळतील याची काळजी घ्यावी, असे श्री. आबिटकर यांनी सांगितले.

सार्वजनिकआरोग्यमंत्रीआबिटकर म्हणाले की, आशा सेविकांचे मानधन वेळेत मिळावे, यासाठी काटेकोर पावले उचलावीत. विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच डीबीटी योजनेंतर्गत निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर वेळेत पोहोचावा, यासाठी प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यावर भर देण्यात यावा. गरजेच्या वस्तूंचीच खरेदी सीएसआर माध्यमातून करावी, तसेच गरजू रुग्णांना आरोग्यसेवा पुरवण्यासाठी सीएसआर निधीचा उपयोग व्हावा, यासाठी तरतूद करावी.आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करावी, तसेच पॉलिएटिव्ह केअर कार्यक्रम प्रभावीपणे राबवावा, कर्करोग रुग्णांना दर्जेदार सेवा मिळाव्यात यासाठी स्वतंत्र मूल्यमापन समिती नेमावी. मानसिक आरोग्य, आयूष सेवांचा विस्तार आणि आरोग्यविषयक जनजागृती या विषयांवर विशेष भर द्यावा. नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन नियोजन करावे, राज्यातील सर्व आरोग्य समन्वयकांच्या मासिक बैठका घेऊन कामाचे मूल्यमापन नियमितपणे करावे, विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या अनुभवाचा उपयोग करून सेवांचा दर्जा उंचवावा, असे निर्देशही सार्वजनिक मंत्री आबिटकर यांनी दिले.

**आरोग्य पर्यटनाअंतर्गत राज्यात दंतोपचाराला मोठी संधी – सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर**

महाराष्ट्र शासन आरोग्य पर्यटनाला चालना देणार असून, राज्यात विशेषतः मुंबईत असलेल्या पायाभूत सुविधा, कुशल तज्ज्ञ आणि कमी खर्चातील सेवा यामुळे दंत उपचाराला आरोग्य पर्यटनाच्या क्षेत्रात मोठी संधी असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

इंडियन डेंटल असोसिएशन (आयडीए) तर्फे स्थापन करण्यात आलेल्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम एज्युकेशन, रिसर्च अँड इन्क्युबेशन सेंटर (प्रभादेवी, मुंबई) येथे सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांनी भेट देऊन केंद्राची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते.

सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले की, दंतोपचारसेवेची जागतिक मागणी वाढत आहे. आंतरराष्ट्रीय रुग्णांना आकर्षित करण्यासाठी जागतिक दर्जाची सेवा मुंबईत आहे. इंडियन डेंटल असोसिएशन गिनीजबुक मध्ये रेकॉर्ड असलेली जागतिक दर्जाची संस्था गेली ७८ वर्षे चांगली सेवा देत आहे. संशोधन आणि प्रशिक्षण क्षेत्रात आयडीए चे काम उत्तम आहे. राज्य शासन आणि इंडियन डेंटल असोसिएशन मिळून दंत आरोग्य जनजागृती, प्रतिबंधात्मक कार्यक्रम, संशोधन आणि कौशल्यविकास या क्षेत्रात काम करता येईल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांचे स्वागत आयडीएचे मानद सरचिटणीस डॉ. अशोक धोबळे यांनी केले व अत्याधुनिक सुविधांची सविस्तर माहिती दिली. डॉ. अशोक धोबळे म्हणाले की, मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. या भेटीने प्रत्येक नागरिकापर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला आहे.

'हेल्दी स्माईल मिशन २०२५' अंतर्गत महाराष्ट्र शासन आणि इंडियन डेंटल असोसिएशन यांनी एकत्रितपणे दंत आरोग्य सुधारणा व प्रतिबंधात्मक सेवा देण्याचा संकल्प केला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पत्रकारांनी एआय जनरेटेड कंटेंट वापरताना पडताळणी करणे आवश्यक

## प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांचे प्रतिपादन; वृत्तपत्र तसेच डिजिटल माध्यम पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : एआय-जनरेटेड कंटेंटची पडताळणी आता आवश्यक असून डीपफेक तपासासाठी आता १५-२० पॅरामीटर्सवर आधारित विशेष टूल्स तयार झाली आहेत. त्याचबरोबर, फॅक्ट-चेकिंग संस्थांही सर्व फॅक्ट्स पडताळत नाहीत. त्यामुळे पूर्वग्रह असू शकतो. 'एआय'मधील बायस हा आज जागतिक पातळीवरील मोठा प्रश्न आहे, असे मत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केले.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ तसेच मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालयात आयोजित वृत्तपत्र तसेच डिजिटल माध्यम पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, 'एआय' हे सत्याचा स्रोत नाही. ते माहितीचे स्वरूप बदलू शकतात, सारांश देऊ शकतात, पण ते सत्य ठरवू शकत नाही. नव्या पिढीचे टूल्स (उदा. रिअल-टाइम सर्च करणारी ख) अनेक स्रोतांमधून माहिती गोळा करून त्वरित सारांश देऊ शकतात. हे पत्रकारांना त्वरित संदर्भ देऊन



रिपोर्टिंग सोपे करतात; परंतु या माहितीचे स्रोत तपासणे आवश्यक असल्याचेही त्यांनी आर्वजून सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे मिळालेल्या संदर्भांवर मानवी पडताळणी नसतानाही निष्कर्ष देणे धोकादायक ठरू शकते. म्हणूनच मानवी नियमन आणि पडताळणी अनिवार्य असावी, असे त्यांनी ठळकपणे नमूद केले.

संवेदनशील किंवा दस्तऐवजीकरण ऑनलाईन टूल्समध्ये अपलोड करण्यापूर्वी सतर्कतेची गरज असल्याचे मत व्यक्त करत प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, ऑनलाईन प्रश्न, अपलोड केलेली सामग्री आणि शोधमागील ट्रेस कायम राहतात आणि संबंधित कायदेशीर चौकशीत प्राप्त करण्यायोग्य असू शकतात. त्यामुळे गोपनीय माहिती शेअर करताना व्यवस्थात्मक व कायदेशीर बाबी समजून घेणे गरजेचे ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

'एआय' कधीकधी खोटे संदर्भ तयार करू शकते, त्यामुळे वैज्ञानिक किंवा कायदेशीर बाबींमध्ये 'एआय' वर अवलंबून राहणे धोकादायक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. डीपफेक तयार करणे सोपे झाले आहे, परंतु ते शोधणे कठीण होत चालले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर 'एआय' जनरेटेड कंटेंटवर वॉटरमार्किंगसारखे नियमन असल्याचेही त्यांनी सांगितले

प्रधान सचिव सिंह यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता हे शक्तिशाली साधन आहे परंतु त्याचा वापर करताना स्रोत-पुष्टीकरण, गोपनीयता संवर्धन, कायदेशीर जबाबदाऱ्या आणि मानवी नियमन या सर्व गोष्टींना प्राथमिकता द्यावी. त्यांनी सांगितले की, ऑफलाइन, एन्क्रिप्टेड आणि स्थानिक जीपीयू-वर चालणाऱ्या वातावरणात संवेदनशील तपासणी करणे सर्वोत्तम पद्धत आहे. त्याचबरोबर तंत्रज्ञान वेगाने बदलत असल्याने पत्रकारितेतील कार्यप्रणाली व कायदे यात पत्रकारांनी सतत अद्ययावत राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

# करमाळा नगरपालिका निवडणूक, तिसऱ्या दिवशी अर्ज दाखल संख्या निरंक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा नगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशीही कोणताही अर्ज दाखल झाला नसल्याने दाखल अर्ज संख्या निरंक असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी दिले आहे.




जगताप आणि सावंत गटाच्या संभाव्य युतीची शक्यता लक्षात घेता पहिले दोन दिवस अर्ज दाखल झाले नाहीत, असे वाटत होते मात्र जगताप गटाकडून उमेदवारी डावलेल्या गेलेल्या उमेदवारांनी सावध गटात प्रवेश केल्यानंतर या युतीची शक्यता जवळपास मावळ आहे. त्यामुळे करमाळा नगरपालिका निवडणुकीत तिरंगी लढत स्पष्ट झाली आहे. जगताप गटाकडून नगराध्यक्ष पदासाठी मा.आ. जयंतराज जगताप यांच्या अर्धांगिनी. सौ. नंदिनी देवी जयंतराव जगताप यांचे नाव चर्चिली जात असली तरी नगरसेवक पदासाठीच्या उमेदवारांची सरस निर्णय पारक केली जात असल्याने जगताप गटाच्या अंतिम यादी बुधवारपर्यंत जाहीर झाली नव्हती. नगरपालिका निवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवाराच्या मुलाखती घेतल्या गेल्यानंतर नरदक्ष पदाच्या उमेदवारीसाठी सौ जयश्री विलासराव घुमरे यांचे नाव फायनल झाल्याची तसेच नगरसेवक पदासाठीच्या उमेदवारी बाबत बुधवारी उशिरा निर्णय होण्याची चर्चा होत आहे एकला चलो रेचा नारादित करमाळा नगरपालिका निवडणूक साठी नगराध्यक्ष पदा सहन नगरसेवक पदासाठी सर्व प्रभागातून उमेदवार देण्याचा चंग बांधलेल्या सावध गटाकडून माझी नवरी नगरसेवक संजय सावंत यांच्या पत्नी सोममोहिनी संजय सावंत यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी ठरलेले असून आखात्य रितील प्रभागासह इतर प्रवाहातूनही सावंत गटाला येऊन मिळणाऱ्या उमेदवाराची उमेदवारी फिक्स केली जात आहे.

विविध कारणांनी तीन दिवसांपर्यंत उमेदवारी अर्ज भरले गेले नसले तरी गुरुवारचा मुहूर्त गाठण्यासाठी अनेक जण थांबल्याने बोललेले जात होते. त्यामुळे बुधवारी म्हणजेच अर्ज दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी कोणताही अर्ज दाखल करण्यात आला नसला तरी प्रचारासाठी असलेला अल्प कालावधी लक्षात घेऊन आज म्हणजे गुरुवारी अनेकांचे अर्ज भरले जाण्याची शक्यता आहे.

# देवरुंग येथे जमिनीच्या वादातून गोळीबार; पडघा पोलिसांनी सहा आरोपींच्या आवळल्या मुसक्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : जमिनीच्या वादातून चुलत मामानं सहा जणाशी संगनमत करून भाच्यावर गोळीबार केल्यानं मोठी खळबळ उडाली. ही धक्कादायक घटना मंगळवारी रात्री भिंवडी तालुक्यातील देवरुंग गावाच्या परिसरात भर रस्त्यात घडली आहे. याप्रकरणी पडघा पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आतापर्यंत चुलत मामासह ६ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. रुपेश म्हात्रे, राकेश म्हात्रे, किसन म्हात्रे , भरत पाटील, विश्वनाथ पाटील, चेतन शिसवे अशी सहा अटक केलेल्या आरोपींची नावे असून चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. तर विकी दळवी (वय २८ रा. देवारुंग ) असं गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या भाच्याचं नाव आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाचा विकी दळवी हा भिंवडी तालुक्यातील देवरुंग गावात कुटुबीयांसह राहत असून याच भागात त्याचा चुलत मामा राहतो. त्यातच दोघा मामा भाच्यात जमिनीचा वाद सुरु होता. याच वादातून भाच्याला संपवण्याचा कट चुलत मामानं रचला अशी माहिती पोलीस तपासात समोर आली. विकी दळवी हा मंगळवारी रात्री ७ वाजताच्या वाजण्याच्या सुमारास, लोनाड गावात त्याच्या दुचाकीनं रुग्णालयात जात होता. यावेळी त्याचा चुलत मामासह इतर आरोपींनी दुचाकीवरून पाठलाग करत त्याला रस्त्यात गाठलं. देवरुंग गावाच्या हद्दीतील रस्त्यात आरोपींनी त्याच्यावर रिव्हॉल्व्हरमधून गोळीबार केला. या गोळीबारात भाचा विकी हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर कल्याण पश्चिम भागातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

गोळीबाराच्या घटनेनंतर पडघा पोलिसांनी बुधवारी बीएनएसच्या कलम १०९(१) (हत्येचा प्रयत्न) आणि ३(५) (हेतू) आणि शस्त्रास्त्र कायद्याच्या तरतुदींनुसार चुलत मामासह सहा आरोपींना अटक केली. तर १२ नोव्हेंबरला सहा आरोपींना भिंवडी जिल्हा सत्र न्यायालयात हजर केलं असता, सहाही आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी

देण्यात आली आहे. दुसरीकडं गोळीबार प्रकरणामुळे गावात तणाव पाहता पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. या घटनेचा पुढील अधिक तपास पडघा पोलीस पथक करीत आहेत.

# पंढरपूर नगरपरिषदेसाठी चौथ्या दिवशी चार अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर नगरपरिषदेसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी प्रभाग क्रमांक २ अ व ब मधून एकेक तर प्रभाग क्रमांक ११ ब मधून दोन असे चार उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

चौथ्या दिवशी प्रभाग क्रमांक २ अ मधून डोंबे अमित अशोक, व २ ब मधून डोंबे अदिती अमित यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तसेच प्रभाग ११ ब मधुन गाजरे गौतम काशिनाथ यांचा १ उमेदवारी अर्ज तसेच , प्रभाग ११ ब मधुन मलपे प्रशांत शिवाजी यांचाही १ उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे.

दरम्यान, चौथ्या दिवसाअखेर ६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. पहिल्या दिवशी आदित्य चंद्रकलेश्वर फत्तेपूरक यांचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. मात्र, दुसऱ्या दिवशी एकही नगरसेवक व नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही. तर तिसऱ्या दिवशी धोत्रे रुक्मिणी धनाजी यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे.

पंढरपूर नगरपरिषद येथील सभागृहात उमेदवारांना सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर पर्यंत आहे.

# राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी चारुशीला कुलकर्णी यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच निवड झालेल्या कु. चारुशीला कुलकर्णी यांचा पंढरपूर येथील नागेश दादा फाटे संपर्क कार्यालयात उत्साहात सत्कार करण्यात आला. चारुशीला कुलकर्णी यांच्या या महत्वपूर्ण निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी हा खास समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी, नागेश दादा फाटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. चारुशीला कुलकर्णी यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना पुढील कामासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी बोलताना नागेश फाटे म्हणाले चारुशीला कुलकर्णी यांनी पक्ष संघटनेसाठी वाढी साठी आज पर्यंत मोठे काम केले आहे. त्यांच्या निवडीमुळे युवतींना अधिक प्रेरणा मिळेल, व पक्ष संघटना अधिक मजबूत होईल असे मत नागेश दादा फाटे यांनी व्यक्त केले.ह्या सत्कार समारंभाला श्री. अभिजित कवडे, सौ. सुप्रिया

**नागेश दादा फाटे संपर्क कार्यालयात सत्कार सोहळा**

अभिजित कवडे, श्री. किशोर कवडे आणि सौ. अनिता किशोर कवडे स्वप्नाली घोडके हर्षा सुतार संग्राम कापसे विनय शिंदे आदी उपस्थित होते. या निवडीमुळे राष्ट्रवादी युवती काँग्रेसला अधिक बळ मिळेल आणि युवतींचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रभावी नेतृत्व उपलब्ध होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### शब्दांचे जादूगार, विचारवंत मार्गदर्शक व्यक्तिमत्त्वाचे दुर्दैवी निधन

# डॉ. सतेंद्रजी भुसारी यांच्या जाण्याने शब्दाचा जादूगार हरवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

चिखली तालुक्यातील ज्येष्ठ काँग्रेस नेते, चिखली बाजार समितीचे माजी सभापती, तसेच विचारवंत, लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. सतेंद्रजी भूसारी यांच्या अपघाती निधनाने एक प्रगल्भ, विचारशील आणि लोकहितैषी व्यक्तिमत्त्व कायमचे हरपले आहे.

मुंबईतील टिळक भवन येथे झालेल्या प्रदेश काँग्रेसच्या राज्य निवड मंडळाच्या बैठकीला पैठण विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक म्हणून ते उपस्थित होते. बैठक आटोपून चिखलीकडे परतीच्या प्रवासात रेल्वेतून पडून झालेल्या अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाली. उपचारासाठी नाशिककडे नेत असताना रस्त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. या दुःखद घटनेने केवळ राजकीय क्षेत्रातच नाही तर सामाजिक आणि वैचारिक क्षेत्रातही शोककळा पसरली आहे.

डॉ. भूसारी हे व्यक्तिमत्व फारच जिव्हाळ्याचे होते. प्रचंड वाचन, अध्ययन आणि अनुभवातून निर्माण झालेल्या तात्विक, वैचारिक चर्चांमध्ये त्यांची उपस्थिती नेहमीच प्रेरणादायी ठरायची. कुठल्याही राजकीय, सामाजिक किंवा सांस्कृतिक विषयावर चर्चा करताना त्यांची मांडणी सखोल आणि अभ्यासपूर्ण असे. परंतु हे ज्ञान ते फक्त स्वतःसाठी वापरत नव्हते, तर तरुणांना मार्गदर्शन करण्यासाठी सतत त्याचा उपयोग करत होते.



चुकीच्या विचारांकडे निर्देश करताना त्यांनी कधीही अपमान किंवा कडवटपणा दाखवला नाही; मार्गदर्शन नेहमी प्रेमळ, संयमी आणि प्रेरणादायी होते.

त्यांचा विश्वास असा होता की समाजात थेट परिवर्तन घडवणे कठीण आहे, पण स्वतःमध्ये बदल घडवून आपली वागणूक चार लोकांच्या मनात बदल घडवू शकते, आणि हेच खरी बदलाची सुरुवात आहे.

डॉ. भूसारी हे विचारांचे मार्गदर्शक आणि अभ्यासू लेखक होते. प्रचंड वाचन आणि वैचारिक चर्चा यामुळे त्यांनी समाजाला नेहमी नवे दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न केला, चालणे हा व्यायामाचा राजा आहे, युद्ध बलिदान मागत नसते, लग्न कुटुंबासाठी की सामाजिक बडेजावासाठी, आणि सिंदखेड राजा भक्ती मार्ग शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा असे लेख त्यांनी लिहून समाजाला विचार करण्यास भाग पाडले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल त्यांना अपार आस्था होती. सरकारने सोयाबीन खरेदी सुरू करावी म्हणून दिलेली निवेदने असो किंवा भक्ती मार्गामुळे शेतकऱ्यांची जमीन वाया जाऊ नये म्हणून केलेली आंदोलने प्रत्येक प्रश्नावर ते जिवापाड गांधी मार्गाने लढले. गावोगावी फिरून शेतकऱ्यांना जागरूक करणे, जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदने देणे, प्रशासनाशी थेट संवाद साधणे हा त्यांच्या सातत्यपूर्ण लोकहिताचा प्रवास होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विचारांची देवाण-घेवाण करण्याची कला. विविध विषयांवर तासनतास चर्चा करणे, लेखनातून समाजाशी संवाद साधणे आणि सर्वांचे विचारपूर्वक ऐकणे या गुणांमुळे त्यांनी आपल्याभोवती एक विचारशील समुदाय तयार केला. त्यांची लेखणी आणि वाचनाची आवड म्हणजे समाजाशी संवाद साधण्याचा माध्यम होता. वाचन, विविध लेखकांच्या दृष्टिकोनांचा अभ्यास आणि त्या संदर्भातील तत्त्वज्ञानिक चर्चा हे त्यांचे नियमित व्यायाम होते. यामुळेच डॉ. भूसारी यांच्याशी मैत्री करणे म्हणजे ज्ञानसंपन्नतेच्या प्रवासात सामील होणे होतं. ते आपल्या विचारांमधून समाजाला आरसा दाखवायचे; सणासुदीला श्रीमंत माणसं आराम का करत नसतील? असे लेखातून प्रश्न विचारून विषमतेची जाणीव करून देत

डॉ. भूसारी हे विचारांची देवाण-घेवाण करणारे मित्र होते. प्रत्येक चर्चा, प्रत्येक लेख, संवाद जागवण्यासाठी होते. ते नवीन कल्पनांना नेहमी प्रोत्साहन देत आणि विद्यार्थ्यांपासून अनुभवी नेत्यांपर्यंत सर्वांना विचारांच्या प्रवासात सोबत घेऊन जात. वयाने मोठे असले तरीही, त्यांच्या संवादात उत्सुकता, स्नेह आणि सहजता दिसायची. आज त्यांच्या जाण्याने चिखली तालुका आणि परिसराने एक मार्गदर्शक, लेखक, विचारक आणि सच्चा समाजसेवक हरवला आहे.

डॉ. सतेंद्रजी भूसारी शब्दांचा जादूगार, विचारांचा दीपस्तंभ, आणि जनसेवेला जीवन समर्पित केलेले एक महान व्यक्तिमत्त्व आपल्यापासून कायमचे दूर गेले.


डॉ. साहेबांना भावपूर्ण श्रध्दांजली.

# पंढरपूर अर्बन बँकेतर्फे कै. देशभक्त बाबुरावजी जोशी व्याख्यानमालेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि., पंढरपूर तर्फे प्रतिवर्षीप्रमाणे सहकार सप्ताहाचे औचित्य साधुन कै.देशभक्त बाबुराव जोशी व्याख्यानामालेचे आयोजन दि.१४ ते १६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत कर्मयोगी सभागृह, खवा बाजार, नवीपेठ, पंढरपूर येथील शाखेत करणेत आल्याची माहिती बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी दिली.



याप्रसंगी माहिती देताना ते म्हणाले, पंढरपूर अर्बन बँक यावर्षी ११४ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. सभासद, ग्राहक, हितचिंतक यांचे अर्थकारणाबरोबरच विविध प्रश्नांवर विचार मंथन होवुन समाजप्रबोधन व्हावे, यासाठी व्याख्यानमालेचे आयोजन करणेत आले आहे.

सदर व्याख्यानमालेचा शुभारंभ शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं.६.०० वाजता आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक श्री.शैलेंद्र देवळाणकर, पुणे यांचे ट्रम्प, टेरिफ आणि भारत व्दारे होणार आहे. तसेच शनिवार दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्द मानसोपचार तज्ञ डॉ.नंदकुमार मुलमुले, नांदेड यांचे यशाकडून समाधानाकडे व रविवार दि.१६ नोव्हेंबर २०२५ रोजी एमएबी एविऐशनचे संचालक ज्येष्ठ पत्रकार श्री.मंदार भारदे, मुंबई यांचे सुखी होण्याची तारीख ठरली का? याप्रमाणे व्याख्यान आयोजित केले आहे. सदर व्याख्यानमाला कर्मयोगी सभागृह, खवा बाजार, नवीपेठ, पंढरपूर येथे दररोज सांयकाळी ६.०० वाजता आयोजित केला आहे. या व्याख्यानमालेस रसिक प्रेक्षकांनी उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा असे आवाहन बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

**शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक, पुणे श्री.शैलेंद्र देवळाणकर यांचे विषय-ट्रम्प, टेरिफ आणि भारत शनिवार दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्द मानसोपचार तज्ञ, नांदेड .डॉ.नंदकुमार मुलमुले यांचे विषय-यशाकडून समाधानाकडे व रविवार दि.१६ नोव्हेंबर २०२५ रोजी एमएबी एविएशनचे संचालक ज्येष्ठ पत्रकार, मुंबई श्री.मंदार भारदे यांचे विषय-सुखी होण्याची तारीख ठरली का?**

याप्रसंगी बँकेचे व्हाईस चेअरमन माधुरीताई जोशी, संचालक रजनीश कवठेकर, हरिष ताठे, पांडुरंग घंटी, शांताराम कुलकर्णी, विनायक हरिदास, राजाराम परिचारक, अमित मांगले, अनंत कटप, गणेश शिंगण, ऋषिकेश उत्पात, व्यंकटेश कौलवार, मनोज सुरवसे, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, तज्ञ संचालक अतुल कौलवार, प्रभुलिंग भिंगे, उदय उत्पात, सोमनाथ होरणे, शुभम लाड, संचालिका संगिता पाटील व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे आदी मान्यवर उपस्थित होते.

# वळसंग गट जि.प., पं.स. निवडणुकीत भाजपमध्ये इच्छुकांची गर्दी

## इच्छुकांच्या भाऊगर्दी ; भाजपमध्ये उमेदवारीसाठी येणाऱ्यांची संख्या पाहता नेतृत्वाची लागणार कसोटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वळसंग /प्रतिनिधी : एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असणारा वळसंग जिल्हापरिषद व पंचायत समिती मतदारसंघात भाजपची ताकत वाढली असून भाजप मध्ये इच्छुकांची भाऊगर्दी असून काँग्रेसमध्ये उमेदवार शोधावे लागत आहे. शिवसेना भाजप वेग-वेगळी लढल्यास शिवसेना (शिंदे गट ) मध्ये ही इच्छुक शोधावे लागतील अशी विद्यमान परिस्थिती आहे.

वळसंग जिल्हापरिषद नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (ओबीसी )झाला असून वळसंग पंचायत समिती अनुसूचित जातीसाठी तर होटगी पंचायत समिती सर्वसाधारण महिला अशा पद्धतीने आरक्षित झालेले आहे. वळसंग नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी झाल्यामुळे या ठिकाणाहून भाजप





कडून माजी पंचायत समिती उपसभापती रामाप्पा चिवडशेट्टी सावकार, युवा नेते महेश बिराजदार व मलकप्पा कोडले, अनिल बर्वे हे प्रमुख दावेदार मानले जात असून यात रामाप्पा चिवडशेट्टी यांचे नाव आघाडीवर आहे तर अनुसूचित जातीसाठी राखीव झालेल्या वळसंग पंचायत समिती गणात भाजप चे शांत, स्वयंमी असे आमदार कल्याणशेट्टी यांचे निकटवर्तीय बलवान गोतसुर्वे हे एकमेव नाव भाजपमधून पुढे येत आहे.त्याचा जो गेल्या जिल्हापरिषद निवडणुकीत थोडक्यात पराभव झाला होता तो सर्वांच्या जिव्हारी लागला होता. तशात बलवान गोतसर्वे त्यांनी कामात सातत्य ठेवल्याने व एकनिष्ठ पणे कार्य करीत राहिल्याने त्यांच्या बद्दल भागात प्रचंड सहानभूती असून त्याचा फायदा त्यांना होण्याची शक्यता आहे.तसेच त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी वळसंग येथील ऐतिहासिक विहीर सुशोभीकरण कामात जोमाने सहभाग घेत भाजपात बौद्ध समाज जोडण्याचे काम केले आहे त्यामुळे त्यांचे पारडे जड वाटत आहे.

तरी वळसंग काँग्रेस मधून भाजप वाटेवर असलेले काही मंडळी मात्र भागात काँग्रेस विरोधी वातावरण असल्याने आचेगांवकर उमेदवार असल्यास गांव पूर्णपणे एकतर्फी होत असल्याची आचेगांवची परंपरा असल्याने आचेगांव ला उमेदवारी मिळू नये यासाठी व वळसंग मधील कमी समाज असलेल्या व्यक्तीस भाजप ची उमेदवारी मिळावी असे शर्तीचे प्रयत्न बलवान गोतसुर्वे यांना टक्कर देण्यासाठी काँग्रेस माध्यमातून करण्यात येत असल्याच्याचे विश्वासनीय सूत्राकडून कळत आहे. परंतु सर्व भाजप निष्ठावंत भाजप कडून पक्षासाठी झटलेल्या कार्यकर्त्यासच उमेदवारी मिळावी यासाठी एकटवल्याचे कळते.

काँग्रेसकडून व शिवसेना शिंदे कडून अद्याप जिल्हा परिषदेसाठी कोणतेच नाव पुढे येत असल्याचे दिसून येत नाही त्यामुळे अनुसूचित जातीसाठी राखीव झालेल्या वळसंग पंचायत समिती गणातून भाजप तर्फे बलवान गोतसुर्वे व काँग्रेसकडून संजय गायकवाड यांच्यात पुन्हा लढत होण्याची शक्यता दिसून येत आहे. तरी पंडित कोरे,रिपाई चे रामजी गायकवाड,सिद्धाराम वाघमारे, अक्षय गायकवाड, कलय्या स्वामी,महादेव होटकर यांचे ही नाव चर्चेत आहे.

होटगी पंचायत समिती सर्वसाधारण महिला राखीव झाल्याने भाजप महिला आघाडीच्या अंबिका पाटील हे सुद्धा होटगी गणातून एकम ेव नाव पुढे येत असले तरी रामाप्पा चिवडशिट्टी यांचे वळसंग जिल्हा परिषद गटात विचार झाल्यास होटगी

> **या भागात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा दबदबा असल्याने आमदार कल्याणशेट्टी हे कोणताही आणि कुठल्याही गावातून उमेदवार देतील ते सर्वच मान्य करतील व वळसंग भागातून मोठे मताधिक्य मि ळेल त्या मुळे बंडखोरी होण्याची शक्यता नाही.**
>
> **:-मल्लिनाथ ढब्बे वळसंग**

एकाच गावात दोन उमेदवार देणे सोयीचे होणार नसल्याचे सांगण्यात येत असून महेश बिराजदार यांना जिल्हापरिषद उमेदवारी मिळाल्यास मात्र होटगी पंचायत समिती साठी सध्या तरी अंबिका पाटील यांचेच नाव चर्चेत आहे. शिवसेना कडून अद्याप कोणाचे नाव नसल्याने या पैकीच नाराज पैकी जिल्हापरिषद व पंचायत समिती साठी विचार होऊ शकतो. सध्या सर्वच प्रमुख भाजप कडून इच्छुक असल्याने काँग्रेस मधून जिल्हापरिषद साठी कोणताही चेहरा पुढे येत नसल्याचे दिसून येत आहे. जिल्हापरिषद गटात भाजप कडून कोणता चेहरा पुढे येईल हे स्पष्ट झाल्यानंतर या वरून लढत दुरंगी कि तिरंगी होईल हे चित्र स्पष्ट होईल. त्यामुळे सध्यातरी भाजप मध्ये इच्छुकांची भाऊगर्दी दिसून येत असली तरी निष्ठावंतास डावलले गेल्यास त्याची किंमत ही तेवढीच मोजावी लागणार आहे, त्यामुळे इच्छुकांच्या भाऊगर्दीत आणि बाहेरून भाजपमध्ये उमेद्वारी साठी येणाऱ्यांची संख्या पाहता नेतृत्वाची कसोटी लागणार हे निच्छित.

# आम्हाला शिकण्यासाठी हक्काची अंगणवाडी द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी/मुन्नाभाईनंदागवळी : भारतीय संविधानानुसार म ानवाचे सर्व अधिकार प्राप्त झाले आहे. परंतु काही ठिकाणी हक्क व अधिकार असूनही मिळत नाही. असेच काही कवठा गाव-ातील बालके तीन महिन्यापासून शिक्षणाचा हक्क मागत आहेत. परंतु इमारत असल्याने त्यांना एका शिक्षण घेताच येत नाही. ही फारच मोठी शोकांतिका पाहावयास मिळत आहे. म्हणून बालकांना शिकण्यासाठी अंगणवाडी दया. अशी मागणी कवठा गावात केली जात आहे.

जवळील कवठा या लहानशा गावात गेल्या अनेक वर्षांपासून खूप जुनी अंगणवाडी तयार होती. परंतु ती अंगणवाडी ही ३-४ महिन्यापासून गळत आहे.

> **अनेक महिन्यापासून मागणी केली, ग्रामपंचायत पदाधिकारी लक्ष देत नाही. छत पडणार आहे अशी अवस्था झाली आहे. तर आम्ही कसे शिकवायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे.**
>
> **– कलम युवराज उरकुडे अंगणवाडी सेविका, कवठा**

तीचे छत केव्हाही कोसळून पडू शकते अशी अवस्था झालेली आहे. त्यामुळे ३-४ महिन्यापासून त्या अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या बालकांना शिक्षण घेण्यासाठी जागाच नाही. तर सध्या समाज मंदिरात तात्पुरते काम चालविले जात आहे.

यापूर्वी सदर अंगणवाडी सेविकेने ग्रामपंचायत येथील सरपंच व ग्रामसेवक यांना दोनदा पत्र व्यवहार करुन इमारतीची मागणी केली आहे. पण यावर सरपंच व ग्रामसेवक यांनी 'आम्ही काहीच करू शकत नाही' असे उत्तर दिल्याचे सेविकेने सांगितले आहे.

> **तीन महिन्यापासून बालके मंदिरात शिकतात; कवठा नवीन इमारतीची मागणी**

अर्जुनीमोरगाव तालुक्यातील जिल्हा परिषद अध्यक्ष आहेत. यांना ही समस्येचे निराकरण करण्यासाठी फोन केला व माहिती देण्यात आली आहे.



जिल्हा परिषद अध्यक्षांच्या तालुक्यातच अंगणवाडीची सम स्या निर्माण झाली आहे.


कवठा गावात चिमुकल्या बालकांना अक्षरे गिरविण्यासाठी अंगणवाडी आवश्यक आहे. याकरिता अंगणवाडी सेविकेने प्रयत्न केले परंतु या कामाकडे अजिबात लक्ष देण्यास आहे नाही म्हणून सध्या समाज भवनात बालकांना शिकविले जात आहे. या गावातील बालकांना हक्काची अंगणवाडी पाहिजे अशी मागणी केली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा येथील स्मारक उभारणीसाठी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल समन्वयक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आग्रा येथे ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी म हाराज यांना नजरकैदेत ठेवण्यात आले होते, ती वास्तू महाराष्ट्र शासन अधिग्रहित करून तेथे स्मारक उभारले जाणार आहे. यासाठी आग्रा येथील या जागेचे अधिग्रहण व संबंधित प्रक्रिया राबविण्याकरिता उत्तर प्रदेश शासनाशी समन्वय साधण्यासाठी 'समन्वयक' म्हणून पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महार-ाज यांच्या जयंतीला ३९५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूम ीवर आग्रा येथे आयोजित



कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांना नजरकैदेत ठेवण्यात आले हो-ते, त्या ऐतिहासिक स्थळावर महाराष्ट्र शासनामार्फत भव्य स्म ारक उभारले जाणार असल्याचे जाहीर केले होते. यासाठी आवश्यक निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात येईल, असेही सांगितले होते.

या स्मारकाच्या उभारणीसाठी पर्यटन विभागाला नोडल विभाग म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तसेच आग्रा येथील शिवरायांच्या म ुक्कामाच्या जागेचे अधिग्रहण व संबंधित प्रक्रिया राबवण्यासाठी उत्तर प्रदेश शासनाशी समन्वय साधण्यासाठी राजजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांची सम न्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी म हाराजांचा आग्रा येथील मुक्काम हा स्वराज्याच्या इतिहासातील महत्वपूर्ण घटना आहे. त्या ऐतिहासिक स्मृती जतन करण्यासाठी हे स्मारक उभारले जाणार आहे.

# भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा-२०२५ मधील महाराष्ट्र दालनाचे आज उद्घाटन

**सांस्कृतिक कार्यक्रमाचे १५ नोव्हेंबरला आयोजन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा-२०२५ चे १४ ते २७ नोव्हेंबर दरम्यान प्रगती मैदानावर आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यातील महाराष्ट्र दा-लनाचे उद्घाटन शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वा. उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन, महाराष्ट्र सदन सचिव तथा निवासी आयुक्त आर विमला, विकास आयुक्त (उद्योग) दिपेंद्र कुशवाह, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ उपाध्यक्ष जयदीप कवाडे, व्यवस्थापकीय संचालक विवेक पानसरे आदी मान्यवर उपस्थित रा-हणार आहेत. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या वतीने हे दालन उभारण्यात आले आहे. महाराष्ट्र दालनात एकूण ६० गाळे उभारण्यात आले असून एक जिल्हा एक उत्पादन, महिला बचत गट, महिला उद्योजिका, यांना वाटप करण्यात आले आहेत.

**सांस्कृतिक कार्यक्रम: महाराष्ट्राच्या समृद्ध कला-संस्कृतीचे दर्शन**

महाराष्ट्राची समृद्ध कला आणि संस्कृती दर्शविणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रम ाचे आयोजन शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ठीक ६.०० वाजता प्रगती मैदानातील म्फी थिएटर नं. १ येथे होईल. दोन्ही कार्यक्रमांना मान्यवरांची उपस्थिती राहणार असून, महाराष्ट्राच्या उद्योग-व्यवसायाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी हे दालन महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या सांस्कृतिक कार्यक्रम ाचे पासेस महाराष्ट्र परिचय केंद्र, ए/८ स्टेट एम्पोरिया बिल्डिंग, बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली या कार्यालयात उपलब्ध आहेत. इच्छुकांनी तेथे संपर्क साधावा असे आव-ाहन संयोजकांनी केले आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित आवश्यक सुविधांबाबत सूक्ष्म नियोजन करा : मुख्य सचिव राजेश कुमार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दरवर्षी लाखो अनुयायी मुंबईतील दादर येथील चैत्यभूमीवर येतात. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सोयीसुविधांसाठी सर्व विभागांनी सम न्वयाने सूक्ष्म नियोजन करून त्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्य सचिव राजेश कुमार यांनी दिले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने चैत्यभूमी व शिवाजी पार्क येथे पुरविण्यात येणाऱ्या सुविधांबाबत मुख्य सचिव राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली.

या बैठकीस अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी, माहिती व जनसंपर्क म हासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, अपर विभागीय आयुक्त कोकण सिद्धराम सालीमठ, सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव सो. ना. बागुल, नगरविकास विभागाच्या सहसचिव विद्या हम्पय्या, महापरिनिर्वाण




दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उप-स्थित होते.

मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले, चैत्यभूमी परिसरात मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. दादर व आसपासच्या परिसरात वाहतूक पोलीस यंत्रणांनी रहद-ारीचे योग्य नियोजन आणि नियंत्रण करावे. अनुयायांना मार्गदर्शन मिळावे यासाठी जागोजागी सूचना फलक लावावेत. प्रत्येक विभागाने त्यांची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

भोजन व्यवस्था, आरोग्य सुविधा, सुरक्षाव्यवस्था, पिण्याचे पाणी, शौचालय सुविधा, परिसर स्वच्छता, सीसीटीव्हीची व्यवस्था, विद्युतव्यवस्था, पुस्तकांचे स्टॉल, तसेच शासकीय जाहिरात व प्रसिध्दी या विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीच्या वती-ने श्री. कांबळे यांनी विविध मागण्या मांडल्या. यावेळी म हानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १४२ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा उत्साहात

# समदु:खी लोकांना त्यांच्या हक्क अधिकाराची जाणीव करून देऊन संघर्षासाठी प्रेरित केले पाहिजे : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी): फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्या वृक्षाच्या छायेखाली गुण्यागोविंदाने बसावयाचे आहे, त्या छायेच्या फांद्या तोडण्याचा दुष्टपणा करू नका. या विधानाच्या ८९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित १४२ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा साकेत नगर येथील फाउंडेशनच्या कार्यालयात दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम होते. म ार्गदर्शन करताना ते म्हणाले, समदु:खी,



शोषित व वंचित घटकांना त्यांच्या हक्क-अधिकारांची जाणीव करून देणे आणि त्यांना संघर्षासाठी तयार करणे अत्यावश्यक आहे. समाजातील सर्व एससी, एसटी, ओबीसी व धार्मिक अल्पसंख्याक घटकांना ऐक्याच्या छत्राखाली आणून लोकशाहीचे पावित्र्य जपण्यासाठी प्रश्न विचारणाऱ्या विचारवंतांची फळी उभी केली पाहिजे. त्यांनी पुढे म्हटले की, बलाढ्य शत्रूशी लढण्यासाठी ऐक्य हेच सर्वात प्रभावी अस्त्र आहे. म्हणूनच डॉ. आंबेडकरांचे वचन आजही तितकेच प्रासंगिक आहे.

उद्घाटनपर भाषणात इंद्रानू पेपर प्रॉडक्ट्स चे मालक उद्योजक सशिकांत काळे म्हणाले की, डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे समाज गावकुसात आला, परंतु सततच्या चळवळीअभावी पुन्हा गावकुसाबाहेर जाण्याची वेळ येऊ शकते. म्हणूनच त्यांचे विचार कृतीत आणणे हे आजच्या काळात आपले परम कर्तव्य आहे.

मुख्य वक्ते प्रा. शिवम गायकवाड (डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य म हाविद्यालय, नागसेनवन) यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हटले की, जो समाज शासनात सहभागी असतो, तो शोषणमुक्त असतो. म्हणूनच एकता आणि शिक्षण हे मुक्तीचे दोन आधारस्तंभ आहेत. पीपल्स एज्युकेशन सोसायटीला विद्यापीठाचा दर्जा न मिळाल्याने आपण आजही छायेच्या फांद्या तोडण्याचा परिणाम भोगत आहोत. चायना व जपानने बुद्धत्व स्वीकारले म्हणून ते प्रगत झाले; आपल्यालाही वैज्ञानिक दृष्टिकोनातून समाजविकासासाठी बुद्धत्व स्वीकारणे गरजेचे आहे.

कार्यक्रमात बळीराम किन्हाळकर यांनी बहुजन समाजाला संघटित करून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रामाणिक प्रतिनिधी पाठविण्याचे आवाहन केले. डॉ. व्ही. एच. कांबळे यांनी आर्थिक सबलीकरणाशिवाय सामाजिक परिवर्तन अशक्य असल्याचे नमूद केले. दीपक पगारे यांनी आंबेडकरांच्या वचना-ची आजच्या राजकीय ताटातुटीतही प्रासंगिकता अधोरेखित केली, तर सुभाष ठोकळ यांनी सुशिक्षित वर्गाने आपली जबाबदारी पार पाडून शासनकर्ती जमात निर्माण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला म हापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पमालांद्वारे अभिवादन करण्यात आले.

सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके यांनी केले, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्रा. विलास कटारे यांनी केले.

# ई-केवायसी करण्याचे तहसिलदार सचिन लंगुटे यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यात माहे ऑगस्ट व सप्टेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टी व पुराच्या पाण्यामुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात ई-केवाईसी प्रलंबित असल्यामुळे निधी जमा झालेल्या नाही. त्या संबधित शेतकऱ्यांनी जवळच्या महा ई-सेवा केंद्रावर ई-केवाईसी करुन घ्यावी, असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

तालुक्यात ऑगस्टमध्ये पुराच्या पाण्याने तर सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे अर्थसहाय लाभार्थ्यांच्या बँक खात्यात डिबीटी प्रणालीमार्फत जमा करण्यासाठी ई-केवासी करणे आवश्यक आहे. ई-केवायसी करण्याचे कामकाज सुरु असून संबधित शेतकऱ्यांनी जवळच्या महा ई-सेवा केंद्रावर ई-केवाईसी करुन घ्यावी. जेणेकरुन लाभार्थ्याच्या बँक खात्यात अतिवृष्टीची रक्कम जमा करणे सोईचे होईल.